## अध्याय – 13

देण्यात येणा-या सवलतीची पूर्तता करण्याची पध्दत

पुढील सवलतीचे उपक्रम 18 उपनगरीय रुग्णालयात प्र.वै.अ. व खा.प्र. (मा.आ.से.) यांच्या देखरेखीखाली राबविले जातात.

नागरिकांसाठीचे उपक्रम / उपक्रमांचे नाव

अ) बाहयरुग्ण सेवा

1. महानगरपालिकेत बाहयरुग्णसेवा 15 दिवसांसाठी रु.10/- इतक्या सवलतीत उपलब्ध.
2. सर्वसाधारण प्रयोगशाळा तपासण्या मोफत केल्या जातात.
3. विद्‌युत स्पंदनलेख (इ.सी.जी) तपासणी रु. 20/- प्रति इ.सी.जी इतक्या सवलतीच्या दरात उपलब्ध.
4. क्ष-किरण / सोनाग्राफी तपासणी रु. 30/- प्रति क्ष-किरण व रु. 100/- प्रति सोनोग्राफी इतक्या सवलतीच्या दरात उपलब्ध.
5. औषधे मोफत दिली जातात.
6. महापालिकेतील शालेय विद्‌यार्थ्यांची मोफत तपासणी करुन औषधोपचार केले जातात.

ब) आंतररुग्ण सेवा

1. आंतररुग्ण प्रवेश मोफत दिला जातो.
2. सर्वसाधारण प्रयोगशाळा तपासण्या मोफत केल्या जातात.
3. इ.सी.जी., क्ष-किरण , सोनाग्राफी तपासणी सवलतीच्या दरात होतात.
4. औषधे मोफत पुरविली जातात.
5. पथ्याहार मोफत आहे.
6. सवलतीच्या दरात शस्त्रक्रिया.
7. सवलतीच्या दरातील अतिदक्षता विभाग.
8. गरीब गरजू रुग्णांसाठी धर्मादाय निधी वापरण्याची सुविधा.
9. मनपा आयुक्तांच्या आदेशानुसार उपक्रमाची मुदत योजना.